मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# प्रदूषण करणाऱ्यांची खैर नाही; उपद्रव शोध पथकाची नेमणूक...

## पिंपरी-चिंचवड शहरात प्रदूषण करणाऱ्यांवर महापालिकेने उपद्रव शोध पथकाची नेमणूक : या कामास आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी स्थायी समितीची मान्यता दिली

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरात प्रदूषण करणाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी महापालिकेने उपद्रव शोध पथकाची नेमणूक केली आहे. त्यासाठी दोन एजन्सींना काम देण्यात आले आहे. या खासगी एजन्सींच्या पथकांकडून दंडातून जमा झालेल्या रक्कमेपैकी ४० टक्के रक्कम महापालिकेकडे जमा केली जाणार आहे.



शहरात प्रदूषण नियंत्रणाकरीता उपद्रव शोध पथकांची नेमणूक करण्यासाठी महापालिकेच्या पर्यावरण अभियांत्रिकी विभागाने निविदा प्रसिद्ध केली होती. त्यासाठी तीन निविदा प्राप्त झाल्या. त्यापैकी दोन निविदा पात्र ठरल्या. लघुत्तम दर असलेल्या शुभम उद्योग आणि सैनिक इंटेलिजन्स ॲण्ड सिक्युरिटी प्रा. लि. या एजन्सीचे दर एकसमान आहेत. त्यामुळे या दोन्ही एजन्सींना शहराचे दोन भाग करून काम देण्यात आले आहे. त्यास आयुक्तांनी मान्यता दिली आहे.

शुभम उद्योगकडे ब, ड, ग आणि ह क्षेत्रीय कार्यालयाचा भाग आणि सैनिक इंटेलिजन्सकडे अ, क, फ आणि ई क्षेत्रीय कार्यालयाचा भाग देण्यात आला आहे. त्या-त्या भागांत संबंधित एजन्सी कारवाई करून दंड वसुल करणार आहे. हे काम ३ वर्षे चालणार आहे. त्या कालावधीत जमा होणार्या ४ कोटी ३४ लाख ४६ हजार ५२५ रुपये रक्कमेपैकी ४० टक्के रक्कम महापालिकेकडे जमा केली जाणार आहे. उर्वरित ६० टक्के रक्कम संबंधित एजन्सी घेणार आहेत. या कामास आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी स्थायी समितीची मान्यता दिली आहे.

# पिंपरी चिंचवड महापालिकेचा 42 वा वर्धापन दिन उत्साहात साजरा

## महापालिकेच्या वतीने विविध सांस्कृतिक, क्रीडाविषयक कार्यक्रम, रक्तदान शिबीर, खेळ पैठणीचा कार्यक्रमांची मेजवानी

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेचा ४२ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. त्यानिमित्त महापालिकेच्या वतीने विविध सांस्कृतिक, क्रीडाविषयक कार्यक्रम, रक्तदान शिबीर, खेळ पैठणीचा यांसारख्या विविध कार्यक्रमांची मेजवानी महापालिकेतील अधिकारी, कर्मचारी यांच्यासाठी ठेवण्यात आली होती. अधिकारी कर्मचारी यांच्यासह आयुक्त शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, चंद्रकांत इंदलकर यांनी देखील या कार्यक्रमांचा आनंद घेतला.



तत्पुर्वी पिंपरी येथील महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीच्या प्रांगणात सकाळी १० वाजता पिंपरी चिंचवड नगरीचे शिल्पकार दिवंगत अण्णासाहेब मगर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी शहर अभियंता मकरंद निकम, मुख्य आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अभयचंद्र दादेवार, मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रविण जैन, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, प्रमोद ओंभासे, उपआयुक्त अण्णा बोदडे, सिताराम बहुरे, सहाय्यक आयुक्त तानाजी नरळे, मुख्य आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, मुख्य विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह महापालिकेचे विविध विभागांचे विभागप्रमुख, अधिकारी, कर्मचारी, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.

महापालिकेच्या वर्धापन दिनानिमित्त महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय भवनाच्या प्रांगणात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. महापालिकेच्या विविध विभागातील अधिकारी कर्मचारी यांनी रक्तदान करून सामाजिक कार्यात हातभार लावला. या शिबिराचे उद्‌घाटन आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते करण्यात आले. या शिबिरादरम्यान आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी महापालिकेच्या अधिकारी कर्मचाऱ्यांना रक्तदान करण्याबाबत आवाहन केले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी केले.

महापालिकेच्या प्रशासकीय भवनातील प्रांगणात महापालिकेच्या अधिकारी कर्मचारी यांनी विविध खेळ आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचा आनंद घेतला. यावेळी रस्सीखेच स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत अधिकारी विरुद्ध कर्मचारी असा सामना बघायला मिळाला. या चुरशीच्या सामन्यात अधिकारी संघाने बाजी मारली. तर महिला अधिकारी कर्मचाऱ्यांमधील रस्सीखेच सामन्यामध्ये कर्मचारी संघाने विजय मिळविला. यानंतर अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी संगीत खुर्ची स्पर्धेचा आनंद लुटला. या स्पर्धेत मोठ्या प्रमाणावर अधिकारी, कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदवला. यामध्ये पुरूष अधिकारी, कर्मचारी संगीत खुर्ची स्पर्धेत मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी निळकंठ पोमण विजयी झाले. तसेच महिला अधिकारी कर्मचारी संगीत खुर्ची स्पर्धेत माहिती व जनसंपर्क विभागातील पौर्णिमा भोर यांनी विजय मिळविला.

# मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाच्या सदस्यपदी फारुख शेख

## मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांच्या शिफारशीनुसार ही नियुक्ती करण्यात आली आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

शिवसेनेचे आकुर्डी विभाग प्रमुख फारूख शेख यांची मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाच्या सदस्यपदी नियुक्ती झाली आहे. ही नियुक्ती तीन वर्षासाठी असणार आहे. मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांच्या शिफारशीनुसार ही नियुक्ती करण्यात आली आहे.



फारूख शेख गेल्या 15 वर्षांपासून शिवसेना विभागप्रमुख म्हणून आकुर्डी भागात कार्यरत आहेत. नगरसेवक प्रमोद कुटे युवा मंचच्या माध्यमातून गेल्या पंधरा वर्षे सामाजिक कार्यात सहभागी असतात. सर्व समावेशक व सर्व समाजाशी सलोख्याचे संबंध आहेत. सर्वांच्या मदतीसाठी तत्पर असतात. गुणवंत विद्यार्थी सत्कार, ईद मिलन, गणेशोत्सव, ईद ए मिलाद, नवरात्रोत्सव, रक्तदान शिबिर, आरोग्य तपासणी सारखे सामाजिक व सांस्कृतिक उपक्रम राबवितात. त्यांच्या कामाची दखल घेऊन खासदार बारणे यांनी फारूख शेख यांची मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाच्या सदस्यपदी नियुक्ती करण्याची शिफारस मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली होती. त्यानुसार फारूख शेख यांची अशासकीय सदस्य म्हणून नियुक्ती झाली आहे. ही नियुक्ती तीन वर्षासाठी आहे.

फारूख शेख म्हणाले, खासदार श्रीरंग बारणे यांच्या मार्गदर्शनाखाली 15 वर्षांपासून समाज कार्य करत आहे. त्याला आता पदाची जोड मिळाली आहे. या पदाचा उपयोग समाजाच्या कल्याणासाठी केला जाईल.

शिवसेना पक्षाचा विभागप्रमुख म्हणून काम करणाऱ्या अल्पसंख्याक समाजाच्या कार्यकर्त्याला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी न्याय दिला असल्याचे खासदार श्रीरंग बारणे म्हणाले.

# विद्यापीठातील चाळीस टक्के सीसीटीव्ही बंद!

## विद्यार्थिनींची छेडछाड, मारहाण आणि विनयभंगाच्या घटना घडूनही सुरक्षेबाबत प्रशासन बेफिकीर, विद्यार्थी, संघटनांचा आंदोलनाचा इशारा

**पुणे | प्रतिनिधी**

ऑक्सफर्ड ऑफ द ईस्ट अशी ओळख असलेल्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात गेल्या काही महिन्यांमध्ये चंदन झाडांची चोरी, विद्यार्थिनींची छेडछाड, विनयभंग आणि मारहाणीच्या घटना घडल्या आहेत. विद्यापीठातील वातावरण सुरक्षित असावे या उद्देशाने कोट्यवधींचा निधी खर्चून सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. आता विद्यापीठातील एकूण २१३ कॅमेऱ्यांपैकी ९३ कॅमेरे बंद असल्याची धक्कादायक कबुली विद्यापीठ प्रशासनाने दिली आहे. एकूण ४४ टक्के सीसीटीव्ही बंद असल्याने सिनेट सदस्यांसह विद्यार्थी-विद्यार्थिनींनी संताप व्यक्त केला असून कुलगुरूसह विद्यापीठाच्या निष्काळजी कारभाराविरोधात आंदोलनाचा इशारा दिला आहे.

गेल्या काही महिन्यांमध्ये विद्यापीठ आवारात मुलींची छेडछाड, धक्काबुक्की, मारहाण आणि विनयभंगाच्या घटना घडल्या आहेत. विद्यापीठातील विविध विभागांमध्ये हजारो विद्यार्थी शिक्षणासाठी येत असतात. त्यासोबतच वसतिगृहात राहणाऱ्या मुलींच्या सुरक्षिततेसाठी रात्रंदिवस ३०० हून जास्त सुरक्षारक्षक तैनात केले आहेत. सोबत कोट्यवधी रुपये खर्चून २१३ नवीन सीसीटीव्ही कॅमेरेही बसविले आहेत. यातील ९३ कॅमेरे गेल्या काही महिन्यांपासून बंद असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.

विद्यापीठ प्रशासनाने संबंधित ठेकेदाराला कॅमेरे दुरुस्त करण्याचे आदेश दिले आहेत का, देखभाल दुरुस्ती कोण करणार, त्यासाठी किती निधी मंजूर केला आहे याची अधिकृत माहिती कळू शकली नाही. पुणे शहरात महिलांवरील अत्याचाराच्या दुर्दैवी घटनांची मालिका सुरू आहे. त्या पार्श्वभूमीवर विद्यापीठ प्रशासनाने गांभीर्याने कॅमेरे दुरुस्ती संदर्भात कारवाई करणे अपेक्षित होते. त्याकडे दुर्लक्ष होत असल्याने संताप व्यक्त केला जात आहे.

याबाबत पदव्युत्तर शिक्षण घेणारी आरती देशमुख म्हणाली, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आवारामध्ये होणाऱ्या हिंसेमुळे संस्थेचं नाव धोक्यात येत आहे. विविध घटनांमुळे पालकांची मुलींच्या सुरक्षिततेसाठी चिंता वाढली आहे. मुलींना शिक्षणासाठी मोठ्या शहरांमध्ये पाठवताना रोज काळजी वाटते. प्रशासनाकडून काहीच ठोस पाऊलं उचलली जात नाहीत. कॅमेरे बंद असल्याची माहिती धक्कादायक असून विद्यापीठाच्या आवारात विद्यार्थिनी सुरक्षित कुठे आहेत, हा एक प्रश्न आहे.

राष्ट्रीय विद्यार्थी काँग्रेस - एनएसयूआयची विद्यार्थिनी प्रतिनिधी सुश्मिता हरणे म्हणाली, कोट्यवधी रुपये खर्चून विद्यापीठात सीसीटीव्ही कॅमेरे लावले आहेत. त्यातील बहुतांश कॅमेरे कामच करत नाहीत. ते दुरुस्त का केले जात नाहीत, हा प्रश्न आहे. विद्यापीठाच्या आवारात विद्यार्थ्यांची सुरक्षा कोण पाहणार? पालकांना रोज भीती वाटते, पण प्रशासनाला याची अजिबात फिकीर नाही. विद्यार्थ्यांचं भविष्य धोक्यात घालून कसं चालेल? तातडीने कॅमेरे दुरुस्त करावेत अशी मागणी आहे. विद्यापीठ प्रशासन एखादी दुर्दैवी घटना घडण्याची वाट पाहात आहेत का ?



### असंवेदनशील व्यवस्थेचा निषेध

» सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ सिनेट सदस्य कृष्णा भंडलकर म्हणाले, सध्या समाजामध्ये महिलांच्या संदर्भात विविध घटना घडत असताना विद्यापीठ प्रशासन विद्यार्थिनींच्या सुरक्षेबद्दल खरंच जागरूक आहे का, असा प्रश्न बंद असणाऱ्या कॅमेऱ्यांची संख्या पाहता मनात येतो. विद्यापीठामध्ये एखादा अनुचित प्रकार घडला तर तर त्याची जबाबदारी कोणता विभाग घेणार आहे. करोडो रुपयांचा खर्च करून हे कॅमेरे बसवले, पण हे कॅमेरे बंद का आहेत याची जबाबदारी कोणाची, यापूर्वी असे प्रकार घडले असताना त्या ठिकाणी सीसीटीव्ही फुटेज उपलब्ध झाले नाही म्हणून गुन्हेगार मोकाट सुटले हे माहीत असतानाही कॅमेरे बंद आहेत. या असंवेदनशील व्यवस्थेचा निषेध करावा तितका कमीच आहे. येत्या काळात आंदोलन करूनच हा प्रश्न सुटेल असे वाटते.

### एखादी गंभीर दुर्घटना होण्याची वाट पाहात आहेत का ?

» राष्ट्रीय युवक काँग्रेसच्या मीडिया सेलचे अध्यक्ष अक्षय जैन म्हणाले, जुने कॅमेरे चांगल्या स्थितीत असतानाही विनाकारण नवीन सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले. त्यासाठी कोट्यवधी रुपयांचा चुराडा करण्यात आला. आता ज्या कंपनीने ते बसविले त्यांनी दुरुस्तही केले पाहिजे. त्यासाठी पुन्हा नवीन निधी देता कामा नये. दुर्दैवाने कुलगुरू, प्र कुलगुरू आणि प्रभारी कुलसचिव यांना काही अधिकार नाहीत. मॅनेजमेंट कौन्सिल आणि सिनेट सदस्यांच्या इशाऱ्यावर ते काम करत आहेत. कितीही आंदोलने केली, निवेदने दिली तरी विद्यापीठ प्रशासन काही ठोस पावले उचलत नाही. ते एखादी गंभीर दुर्घटना होण्याची वाट पाहात आहेत का, असा आमचा प्रश्न आहे.

---

# बोपदेव घाट अत्याचार प्रकरणातील एक आरोपी पोलिसांच्या ताब्यात

## एका आरोपीला अटक केली असल्याची माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे पोलिसांनी बोपदेव घाट अत्याचार प्रकरणातील एका आरोपीला अटक केली असल्याची माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. शुक्रवारी पुण्यात ते माध्यमांशी बोलत होते. इतर दोन आरोपींची माहिती मिळाली असून ते देखील लवकरच सापडतील असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला.

प्राथमिक चौकशीत हे आरोपी अतिशय सराईत गुन्हेगार असल्याची माहिती पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिल्याचे फडणवीस यांनी सांगितले. तसेच, या आरोपींनी कुठलाही डिजिटल पुरावा मागे राहू नये याची काळजी घेतली होती. परंतु पोलिसांनी मोठ्या प्रमाणात टिम्स तयार केल्या होत्या. जवळपास ७०० पोलीस आरोपींचा शोध घेत होते. तंत्रज्ञानाचा वापर करून पोलिसांनी त्यांचा शोध घेतला. या गुन्हेगारांना लवकरात लवकर शिक्षा देण्याचा आमचा प्रयत्न असेल असे फडणवीस यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे आज पुणे दौऱ्यावर होते. पोलीस आयुक्तालय, पुणे शहरअंतर्गत नव्याने मंजूर झालेल्या ७२० कोटी रुपयांच्या विविध प्रकल्पांचा उद्घाटन सोहळा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत पार पडला. यावेळी केंद्रीय राज्यमंत्री, सहकार व नागरी विमान वाहतूक मुरलीधर मोहोळ यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमात शहरात नव्याने उभारण्यात आलेल्या ७ पोलीस ठाण्यांचे उद्घाटन, पोलीस आयुक्तालयात २००० हून अधिक सीसीटीव्ही कॅमेरा बसवणे, पोलीस आयुक्तालयाच्या व बंड गार्डन पोलीस ठाण्याच्या नवीन इमारतीची उभारणी इत्यादी प्रकल्पांचा शुभारंभ करण्यात आला.



शहरात नवीन पोलीस आयुक्तालयाच्या इमारतीचं भूमिपूजन, २६०० नवीन कॅमेरे असलेल्या सीसीटीव्ही फेज २ चा शुभारंभ, पुणे शहरात सात नवीन पोलीस ठाणे , पिंपरी-चिंचवड मध्ये चार पोलीस ठाणे, मीरा भाईंदरमध्ये दोन पोलीस ठाण्यांचे उद्घाटन, फॉरेन्सिक विभागाच्या संगणकीकरणाचा शुभारंभ, पिंपरी-चिंचवडला नवीन आयुक्तालय तयार करण्याकरता ५० एकर जमीन देण्याचा कार्यक्रम असे विविध कार्यक्रम पार पडल्याची माहिती फडणवीस यांनी दिली. तसेच, यामाध्यमातून पोलिसिंगमध्ये बदल करत आहोत. १९६० नंतर पहिल्यांदाच २०२३ मध्ये पोलिसांसाठी नवीन आकृतिबंध तयार केला आहे. त्यामध्ये लोकसंख्येचे निकष बदलले आहे. तसेच पोलिसांमध्ये आधुनिकीकरण आणण्याकरिता तंत्रज्ञानाचा वापर सुरू केल्याचे फडणवीस यांनी सांगितले.

---


# विचार करणारी पिढी घडविणे गरजेचे : संजय आवटे

## मावळ विचार मंचच्या वतीने नवरात्रीनिमित्त आयोजित केलेल्या सरस्वती व्याख्यानमालेत सातवे पुष्प गुंफताना ते बोलत होते.

**पुणे | प्रतिनिधी**

विविध माध्यमांचा प्रभाव असलेली नवी पिढी विचार करत नाही. माध्यम व विचार या दोन्ही पद्धतीने पुढे गेले पाहिजे. त्यासाठी शिक्षक, पालक व व्यवस्थेने विचार करणारी पिढी घडविणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार संजय आवटे यांनी केले.

येथील मावळ विचार मंचच्या वतीने नवरात्रीनिमित्त आयोजित केलेल्या सरस्वती व्याख्यानमालेत सातवे पुष्प गुंफताना ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संत तुकाराम सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष बापूसाहेब भेगडे होते. प्रमुख पाहुणे पत्रकार किरण जोशी, श्रीनिवास नागे, मनसे तालुकाध्यक्ष रूपेश म्हाळसकर, मंचाचे संस्थापक भास्करराव म्हाळसकर, कार्याध्यक्ष रवींद्र आचार्य, अध्यक्ष गुलाबराव म्हाळसकर, कार्याध्यक्ष पूजा पिंगळे, कार्यक्रम प्रमुख भक्ती जाधव आदी उपस्थित होते.



'आम्ही भारताचे लोक' या विषयावर बोलताना आवटे म्हणाले की, वैविध्य हे भारताचे वैशिष्ट्ये व ताकद आहे. देशाला मोठा वारसा व संस्कृती आहे. देशात अनेक प्रकारच्या भाषा, पंथ, प्रांत, चालीरीती व मोठी लोकसंख्या असतानाही आपला देश दिमाखात झेपावत आहे. भारत हा सगळ्या धर्माचा आहे. सगळ्या जातीचा आहे. यासाठी जातीधर्माच्या पलीकडे राहून नव्या पिढीपर्यंत भारत पोचविणे गरजेचे आहे. नवीन पिढी विविध माध्यमांमध्ये अडकली आहे. ती विचार करत नाही. कोणतेही माध्यम विचार करायला शिकवत नाही. विचार आपल्यालाच करावा लागतो. त्यामुळे विचार करणारी पिढी घडविणे गरजेचे आहे. मुलांना स्त्री-पुरुष म्हणून घडविण्याऐवजी माणूस म्हणून घडवा, असे आवाहनही त्यांनी केले. ॲड. विजय जाधव यांनी मानपत्र वाचन केले. अतुल राऊत यांनी सूत्रसंचालन केले. सुषमा जैन यांनी आभार मानले.

# महायुतीतील बंड शमवण्यात अजित पवार अपयशी

## पिंपरी-चिंचवड शहर दौऱ्यानंतर विविध ठिकाणी लागले बंडाचे फ्लेक्स लावत आपली बंडखोरी कायम

**पिंपरी | प्रतिनिधी**

महायुतीतील बंड शमवण्यात उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांना अपयश आल्याचे चिंचवडमध्ये दिसून येत आहे. शहरातील विविध विकास कामांचे उद्घाटन आणि भूमिपूजन करण्यासाठी अजित पवार यांनी बुधवारी (९ ऑक्टोबर) दौरा केला. त्यानंतर त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकारी-कार्यकर्त्यांची बैठक घेत महायुतीच्या उमेदवारांना विजयी करण्याबाबत सूचना केल्या. मात्र अजित पवार यांची पाठ वळताच त्यानंतर काही तासांतच चिंचवड विधानसभेतील इच्छुक उमेदवार नाना काटे यांनी ठिकठिकाणी फ्लेक्स लावत आपली बंडखोरी कायम ठेवली आहे.




चिंचवड विधानसभा मतदारसंघात भाजपचे विद्यमान आमदार आहेत. त्याचबरोबर गेल्या २२ वर्षांपासून दिवंगत लक्ष्मण जगताप कुटुंबीयांकडे आमदारकी आहे. दीड वर्षांपूर्वी जगताप यांचे निधन झाल्यानंतर पोटनिवडणुकीत जगताप यांच्या पत्नी अश्विनी जगताप या भाजपच्या चिन्हावर निवडून आल्या आहेत. पोटनिवडणुकीपूर्वी २०१९ मध्ये नाना काटे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसकडून चिंचवड विधानसभा निवडणूक लढवली होती. त्यात त्यांना पराभव पत्करावा लागला होता. त्यानंतर झालेल्या पोटनिवडणुकीत त्यांनी राष्ट्रवादीकडूनच निवडणूक लढवली मात्र अश्विनी जगताप यांचा विजय झाला होता.

आता पुन्हा नाना काटे चिंचवड विधानसभा निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक आहेत. दोन वेळा पराभव झाल्याने नाना काटे यांना उमेदवारी देण्याऐवजी राष्ट्रवादीमधूनच अन्य व्यक्तीला उमेदवारी द्यावी यासाठी काही नगरसेवक एकत्रित आले आहेत. या नगरसेवकांनीही वेळप्रसंगी महायुतीशी बंड करण्याचे जाहीर केले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी नगरसेवक भाऊसाहेब भोईर हेही निवडणूक लढवण्यावर ठाम आहेत. बुधवारी शहरातील विविध विकासकामांचे उद्घाटन करतानाच पिंपळे सौदागर ते पिंपरीला जोडणाऱ्या नदीवरील पुलाचे लोकार्पण अजित पवार यांच्या हस्ते झाले यावेळी नाना काटे तेथे उपस्थित होते.

सांगवी येथील निळू फुले सभागृहात अजित पवार यांनी बैठक घेत सगळ्यांना एकत्र आणले होते. चिंचवडमधून नाना काटे, पिंपरीमधून काळूराम पवार हे माजी नगरसेवक विधानसभा लढवण्यासाठी इच्छुक आहेत. पिंपरीत अण्णा बनसोडे हे राष्ट्रवादीचे आमदार आहेत, तर भोसरीसह चिंचवडमध्ये भाजपचे विद्यमान आमदार आहेत. भोसरीमध्ये सध्या तरी महायुतीमधून कोणी बंडखोरी करण्याची शक्यता दिसत नाही. परंतु, भोसरी विधानसभेमध्ये इच्छुक उमेदवार असणारे अजित गव्हाणे यांनी अजित पवार यांच्या गटाचे शहराध्यक्षपद सोडून राष्ट्रवादी शरद पवार गटात प्रवेश केला आहे, तर दुसरीकडे चिंचवड आणि पिंपरी विधानसभेत स्व-पक्षासह महायुतीमधून बंडखोरी होण्याची शक्यता आहे. वेळप्रसंगी महायुतीमधील इच्छुक महाविकास आघाडीत प्रवेश करीत निवडणूक लढवण्याची दाट शक्यता आहे. काटे हे स्वतः आता मी तुतारी फुंकणार असल्याचे सांगू लागले आहेत.

### भोसरीतही फ्लेक्स वॉर

**» भोसरी विधानसभा मतदारसंघातही चिंचवडप्रमाणे फ्लेक्स वॉर पाहायला मिळत आहे. विद्यमान आमदार महेश लांडगे यांनी दहा वर्षांत काहीच काम केले नाही असे सांगत इच्छुक उमेदवार अजित गव्हाणे समर्थकांनी अनेक ठिकाणी फ्लेक्स लावले आहेत, तर याला प्रत्युतरात फ्लेक्स लावत मागील दहा वर्षांतील केलेल्या कामांची यादी प्रसिद्ध केली आहे.**

### पिंपरीत महाविकास आघाडीत बिघाडी

**» शिवसेना उद्धव ठाकरे गटातून माजी नगरसेवक जितेंद्र ननावरे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटातून माजी नगरसेविका सुलक्षणा शिलवंत यांच्यासह अन्य अनेक माजी नगरसेवक आणि अन्य पदाधिकारी इच्छुक आहेत. तर भाजपा माजी नगरसेविका सीमा साळवे या शरदचंद्र पवार गटातून इच्छुक असून, त्यांनी शरद पवार यांची नुकतीच भेट घेतली आहे.**

# आरटीओकडून विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या 280 बसची तपासणी

## आरटीओ विभागाची शहरांतर्गत तपासणी मोहीम सुरू : 171 बसचालक आढळले दोषी

**पिंपरी | प्रतिनिधी**

शालेय वाहतुकीचा प्रश्न निर्माण होत असताना, आरटीओ विभागाने शहरांतर्गत तपासणी मोहीम सुरू केली आहे. पिंपरी-चिंचवड प्रादेशिक परिवहन विभागाने (आरटीओ) शालेय वाहतूक करणाऱ्या २८० बसची तपासणी केली असून, यात १७१ बसचालकांनी मोटार वाहन कायद्यातील नियमांचे उल्लंघन केल्याचे निदर्शनास आले आहे. या बसचालकांवर आरटीओकडून कारवाई करण्यात आली असून, त्यांच्याकडून १७ लाख ४७ हजार रुपयांचा दंड वसूल केला आहे. दरम्यान ही तपासणी मोहीम अशी सुरू असून, बसचालकाने यापूर्वीच कागदपत्रांची पूर्तता करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



पिंपरी-चिंचवड शहरात २,९५७ स्कूल बसची नोंदणी आहे. बसव्यतिरिक्त व्हॅन आणि रिक्षांमधूनही शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक केली जाते. पुणे शहरात मागच्या आठवड्यात शालेय मुलांची वाहतूक करणाऱ्या स्कूल व्हॅन चालकाकडूनच दोन चिमुकल्या मुलींवर अत्याचार करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघड झाली होती. या घटनेनंतर पुन्हा शहरातील विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या वाहनांचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. पिंपरी-चिंचवड प्रादेशिक परिवहन विभागामार्फत १ एप्रिल ते ३१ ऑगस्टदरम्यान शहरातील विविध ठिकाणी विशेष तपासणी मोहीम राबविली.

या मोहिमेमध्ये एकूण २८० प्रवासी बसची तपासणी केली. यात बसचालकांकडून विनापरवाना अथवा परवान्याच्या अटींचा भंग करणे, योग्यता प्रमाणपत्र नसणे, वाहनामध्ये बेकायदेशीर फेरबदल करणे, क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी वाहतूक करणे, कर न भरणे अशा विविध नियमांचे उल्लंघन करणाऱ्या १७१ वाहनांवर आरटीओच्या वायुवेग पथकांमार्फत कारवाई केली. मात्र शहरात तीन हजार शालेय वाहतूक करणारी वाहने असताना केवळ २८० वाहनांचीच तपासणी केली.

### ग्रामीण भागातही राबवणार मोहीम

**» पिंपरी-चिंचवड शहराबरोबरच तळेगाव, लोणावळा, खेड, आंबेगाव, जुन्नर हा ग्रामीण भाग आरटीओमध्ये मोडतो. या परिसरातही मोठ्या प्रमाणात स्कूल बस धावतात. अनेकदा कळवून देखील संबंधित बसचालकांनी कागदपत्रांची पूर्तता केलेली नाही. अनेक बसचे योग्यता प्रमाणपत्र अपूर्ण आहे. परिणामी, येत्या काही दिवसांत ग्रामीण भागातही अशा प्रकारची मोहीम राबवणार असल्याचे सांगण्यात आले आहे. आरटीओ विभागाने क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी वाहतूक करणे, कर न भरणे अशा विविध नियमांचे उल्लंघन करणाऱ्या १७१ वाहनांवर आरटीओच्या सात वायुवेग पथकांमार्फत कारवाई केली. मात्र शहरात तीन हजार शालेय वाहतूक करणारी वाहने असताना केवळ २८० वाहनांचीच तपासणी कशी, असा सवाल नागरिक विचारत आहेत.**

# आपत्ती व्यवस्थापन पथकावर आचारसंहितेची आपत्ती?

## नव्याने वाहने, उपकरणांची खरेदी होणार कधी : ठाण्याखालोखाल पुण्यातही पथक होणार कार्यान्वित

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) हद्दीत आपत्ती व्यवस्थापन पथक स्थापन करण्यात येणार आहे. त्यासाठी नव्या वाहनांबरोबरच, उपकरणे आणि मनुष्यबळ आवश्यक असणार आहे. अर्थसंकपामध्ये यासाठी पाच कोटींची तरतूदही आहे. जिल्ह्याची गरज लक्षात व वाढते नागरीकरण या पार्श्वभूमीवर असे पथक असणे आवश्यक आहे. मात्र, यावरती अद्याप कोणतीही कार्यवाही होत नसल्याने ही प्रक्रिया आचारसंहितेमध्ये पुन्हा अडकू शकते.

ठाणे जिल्हा आपत्ती प्रतिसाद पथकाच्या धर्तीवर हे पथक स्थापन होणार आहे. अर्थसंकल्पात पाच कोटींचा खर्च अपेक्षित धरण्यात आला आहे. सात हजार चौरस किलोमीटर क्षेत्रातील पीएमआरडीए हद्दीत जिल्ह्यातील ८१४ गावांचा समावेश आहे. या हद्दीमध्ये आपत्तीवेळी तातडीने मदत उपलब्ध करून देण्यासाठी पीएमआरडीएकडून 'पुणे डिझास्टर रिस्पॉन्स फोर्स' (पीडीआरएफ) स्थापन करण्यात येणार आहे. त्या साठी सध्या उपलब्ध असलेल्या अग्निशमन पथकाकडे त्याची जबाबदारी सोपवण्यात येणार आहे. संबंधित विभागाचे प्रमुख हे त्या पथकाचे प्रमुख असतील.



पीएमआरडीए हद्दीतील आगीच्या घटना तसेच इतर काही अनुचित प्रकार घडल्यास मदतीसाठी अग्निशमन विभाग कार्यरत आहे. आगीच्या घटनांसह दरड कोसळणे, पावसाळ्यात नद्यांच्या पुरामुळे नुकसान होणे, अशा घटना मोठ्या प्रमाणात घडतात. अशा आपत्तीच्या प्रसंगात आपत्तीग्रस्तांना तत्काळ मदत उपलब्ध होणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे पावसाळ्यामध्ये पूरग्रस्त परिस्थिती निर्माण झाली होती. त्यामध्ये पीएमआरडीएच्या हद्दीमध्ये लोक वस्तीमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी शिरले होते. तसेच, ग्रामीण भागात देखील पुरामुळे नागरिकांची हाल झाले. यामध्ये कोणताही अनुचित प्रकार करू नये या साठी आता हे पथक काम करणार आहे. आपत्ती प्रतिसाद पथकासाठी वाहने व उपकरणांची खरेदी केली जाणार आहे. त्यासाठी पीएमआरडीए अर्थसंकल्पात पाच कोटींचा खर्च अपेक्षित धरण्यात आला आहे. यात लाईफ जॅकेट, स्ट्रेचर, जीवरक्षक बोटी उपलब्ध होणार आहे. पीएमआरडीएकडे सध्या तीन अग्निशमन केंद्रे आहेत, तर एका केंद्राचे काम सुरू आहे; मात्र जिल्ह्याचा एवढा मोठा परिसर पीएमआरडीए हद्दीत येत असल्याने आणखी अग्निशमन आणि आपत्ती व्यवस्थापन केंद्रांची आवश्यकता आहे. त्यानुसार पीएमआरडीए हद्दीतील ३४ जागांवर या केंद्रांसाठी आरक्षण टाकले आहे. याबाबत पीएमआरडीए अग्निशमन विभागाचे प्रमुख देवेंद्र पोटफोडे यांच्याशी संपर्क साधला असता ते बैठकीत असल्याची त्यांनी सांगितले.

### अतिरिक्त मनुष्यबळ मिळणार

**» पीएमआरडीएच्या अग्निशमन विभागाकडे कायमस्वरूपी अधिकारी कमी आहेत. पर्यायाने कंत्राटी अथवा सोसायटी मध्ये निर्माण केलेल्या अग्निशमन विभागाची वाहने व मनुष्यबळ वापरले जात होते. दरम्यान, नव्याने कंपन्यांकडून प्रस्ताव मागवण्यात आले असल्याने मनुष्यबात मिळण्याची वाट मोकळी झाली आहे. येत्या आठवड्याभरात त्यावरती कार्यवाही होण्याची अपेक्षा आहे.**

# दसऱ्याला यंदा झेंडूच्या फुलांनी खाल्ला भाव

## प्रतिकिलो झेंडूला मोजावे लागतायेत 80 ते 100 रुपये : पावसाने नुकसान, शेतकऱ्यांचा वाहतूक खर्च

**पुणे | प्रतिनिधी**

यंदाच्या नवरात्रोत्सवात व दसऱ्याला झेंडूच्या फुलांची मार्केटयार्ड बाजारात आवक मोठ्या प्रमाणात होत आहे. मागील वर्षीच्या तुलनेत यंदा फुलांच्या भावात वाढ झाली आहे. दसऱ्याला मागील वर्षी आवक जास्त झालेल्या फुलांचे भाव कमी झाले होते. मात्र यंदा फुलांची आवक साधारण असली तरी दसऱ्यानिमित्त झेंडूच्या फुलांनी यंदा भाव खाल्ला आहे.

झेंडू ८० ते १०० रुपये प्रतिकिलो भाव झाला आहे. तसेच फुलांचा हारांच्या किमतीत वाढ झाली होती. या वाढलेल्या दराचा फायदा शेतकऱ्यांबरोबर फूलविक्रेत्यांना होत असल्याचे चित्र आहे. यामुळे फूल उत्पादक शेतकऱ्यांनी योग्य भाव मिळत असल्याने समाधान व्यक्त केले आहे.

साडेतीन मुहूर्तांपैकी एक दिवस म्हणजे दसरा. या सणाला झेंडूच्या फुलांचा आणि आपट्याच्या पानांचा एक वेगळा मान असतो. त्यामुळे यंदाही दसऱ्याच्या निमित्ताने बाजारात झेंडूची फुले आणि आपट्याची पाने मोठ्या प्रमाणात विक्रीसाठी आली होती. मात्र यंदा दसऱ्यानिमित्त झेंडूच्या फुलांचा भाव खाल्ला असल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले.



मागील वर्षी मार्केटयार्ड फूल आवारात मोठ्या प्रमाणात फुलांची आवक झाल्याने दर कमी मिळाले तर काही शेतकऱ्यांना रस्त्यावर फुलं टाकून द्यावी लागली. यामुळे शेतकऱ्यांनी बाजारात फुलांची आवक कमी झाली. यामुळे यंदा फुलांच्या दरात वाढ झाली आहे.

### दसऱ्याला झेंडूला दुप्पट भाव

**» मागील वर्षी अक्षरशः शेतकऱ्यांना फुले रस्त्यावर फेकून द्यावी लागली होती. झेंडू फुलांना १० ते २५ रुपये प्रतिकिलो विक्री झाली तर काही शेतकऱ्यांचा खर्चही निघाला नाही. यामुळे शेतकऱ्यांनी फुलांची लागवड कमी केली. यामुळे यंदा दसऱ्याला फुलांची आवक कमी झाल्याने फुलांनी भाव खाल्ला आहे. झेंडूला यंदा दुप्पट भाव मिळाला असून, ५० ते १२० रुपये भाव मिळत आहे. यावर्षी गौरी-गणपतीतही फुलांना भाव मिळाला असल्याने दसऱ्यालाही चांगला भाव मिळाला आहे.**

**दरवाढीचे अशी आहेत कारणे :**

यंदा पावसामुळे फुलांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

फूल उत्पादक शेतकऱ्यांना वाहतूक दळणवळण खर्च परवडत नाही.

फूल उत्पादक शेतकऱ्यांना खर्च निघत नसल्याने यंदा दर वाढला

“ मार्केटयार्ड फूल बाजारात गुरुवारपासून फुलांची आवक होण्यास सुरुवात झाली आहे. गुरुवारी साधारण झेंडूची १०५ टन आवक झाली असून, दर ५० ते १०० प्रतिकिलो रुपये आहे. शनिवारी दसरा असल्याने शुक्रवारी रात्री मोठ्या प्रमाणात आवक होण्याची शक्यता आहे. सध्या हिंगोली, सोलापूर, साताऱ्यासह कर्नाटकातून ही बाजारात फुले येत असतात. यंदा मात्र भावात वाढ झाली असून, ४० टक्केच आवक झाली आहे.

**- दादा कंद, फूल बाजार प्रमुख, मार्केटयार्ड**